## निवडक

### आके मधील रहिवाशांनी अनधिकृत चिमणी जबरदस्तीने हटवली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** मडगावच्या आके येथील सनड्यू अपार्टमेंटमधील रहिवाशांनी , त्यांच्या इमारतीच्या छतावर नगरपरिषदेची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आलेली एक्झॉस्ट चिमणी शनिवारी जबरदस्तीने हटवायला लावली.

शनिवारी दुपारी सुमारास, रहिवाशांच्या लक्षात आले की अपार्टमेंटच्या छतावर क्रेनद्वारे काही काम सुरू आहे. काही कामगार चिमणी बसवण्याचे प्रयत्न करत असल्याचे दिसताच रहिवाशांनी तातडीने हस्तक्षेप केला. परवानगी नसलेल्या या कामामुळे संतप्त झालेल्या रहिवाशांनी लगेचच काम थांबवण्याची मागणी केली आणि केवळ अर्ध्या तासात चिमणी न हटविल्यास मुख्य रस्त्यावर निदर्शने करणार असल्याचा इशारा दिला.

रहिवाशांचा आवाज ऐकून मडगाव नगरपरिषदेचे (एमएमसी) संबंधित वॉर्डचे नगरसेवक सिद्धांत गाडेकर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की या चिमणी स्थापनेसाठी कोणतीही महानगरपालिका मंजुरी देण्यात आलेली नाही. वैध परवानगी नसल्याचे स्पष्ट होताच, संबंधित व्यक्तीने नियुक्त केलेल्या कंत्राटदाराला चिमणी तत्काळ हटवावी लागली.

रहिवासी विशाल काकोडे यांनी सांगितले, आम्ही अचानक पाहिलं की एक क्रेन आणि काही कर्मचारी छतावर चिमणी बसवण्याच्या प्रयत्नात आहेत. आम्ही विचारल्यावर त्यांच्या कडे कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती. आम्ही या परिसरात तीन दशकांपासून राहत आहोत. ही कृती फक्त बेकायदेशीर नाही, तर आमच्या अस्तित्वालाही आव्हान देणारी आहे.

काकोडे यांनी मडगाव शहरातील वाढत्या बेकायदेशीर कामांबद्दलही चिंता व्यक्त केली. या प्रकारची कामे राजकीय पाठबळाशिवाय शक्यच नाहीत. आधीच इमारतींची अवस्था खराब आहे, अशा वेळी असं निष्काळजी वर्तन धोकादायक ठरू शकतं.

# सात दिवस उलटूनही फेरी बोट बुडालेलीच !

### चोडण फेरी सेवा ठप्प : बोट वाचवण्याचे प्रयत्न सुरूच | प्रवासी आणि स्थानिक राहिवाशांची गैरसोय

■ टीम दैनिक हेराल्ड



**पणजी, दि. २९ :** चोडण धक्क्यावर बेती फेरी बोट बुडाल्यानंतर सात दिवस उलटून गेले तरी ती अद्याप पाण्याखालीच आहे, आणि त्यामुळे नियमित प्रवासी तसेच स्थानिक रहिवासी यांची गैरसोय तीव्र होत आहे. जलवाहतूक विभागाने बोट बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू ठेवले असले तरी, या मोहिमेच्या यशाबाबत आणि बोट वाचविल्यानंतर तिचा उपयोग कसा होणार, याबाबत अनिश्चितता कायम आहे.

या घटनेमुळे बेट व मुख्य किनारपट्टीदरम्यानची वाहतूक पूर्णतः ठप्प झाली असून, शेकडो प्रवाशांचे दैनंदिन आयुष्य विस्कळीत झाले आहे. स्थानिकांनी याबाबत संताप व्यक्त केला असून, जलद कारवाई आणि जबाबदारी निश्चित करण्याची जोरदार मागणी केली आहे.

शनिवारी पत्रकारांशी बोलताना राज्याचे नदी नौवहन मंत्री सुभाष फळदेसाई यांनी स्पष्ट केले की, बोटीला वाचवण्याचा एक प्रयत्न अयशस्वी झाला असला, तरी ती वाचवण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. ती पूर्णपणे पाण्याबाहेर काढली जाईल व वाया जाणार नाही.

दरम्यान, नदी आणि नौवहन विभागाचे संचालक विक्रमसिंह एन. राजेभोसले यांनी हेराल्डला दिलेल्या माहितीमध्ये सांगितले की, रविवारी पुन्हा प्रयत्न केला गेला, पण यश आले नाही. आम्ही फेरीला पँटूनने बांधले आहे आणि उद्यापर्यंत ती वर खेचली जाईल अशी आशा आहे.

या अपघातानंतर काँग्रेसने भाजप सरकारवर ताशेरे ओढले असून, या प्रकारास गुन्हेगारी निष्काळजीपणा' असे संबोधले आहे. पक्षाचे प्रवक्ते यांनी बंदर विभागाच्या कॅप्टनला तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली असून, या अपघाताची स्वतंत्र न्यायालयीन चौकशी करण्यात यावी, असे ठणकावून सांगितले.

काँग्रेसने दावा केला की, या फेरीच्या स्थितीबद्दल आधीपासूनच वारंवार इशारे दिले जात होते. परंतु, राज्य सरकारने अंतर्देशीय जलवाहतूक व्यवस्थेच्या देखभालीकडे दुर्लक्ष करून केवळ जनसंपर्क आणि राजकीय कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित केले आहे.

२३ जून २०२५ रोजी सकाळी, चोडण रॅम्पजवळ 'बेती' नावाची फेरीबोट एका टाकीत पाणी साचल्यामुळे अंशतः बुडाली. बोटीबरोबर तीन दुचाकी वाहनंही पाण्यात बुडाली होती, मात्र संध्याकाळपर्यंत त्या सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यात आल्या.

दरम्यान, गोव्यातील सागरी सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे, कारण यापूर्वीही जून महिन्याच्या सुरुवातीला मांडवी नदीवरील ब्रिटोना जेट्टीजवळ एमव्ही के–कॅट या वातानुकूलित प्रवासी बोटीला भीषण आग लागली होती. सुदैवाने त्यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र त्या घटनेने देखील सागरी वाहतुकीच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

सध्या चोडण फेरी सेवा बंद आहे आणि बोटीला पाण्याबाहेर काढण्यासाठीची मोहीम सुरू आहे. अधिकाऱ्यांनी सेवा लवकरच पूर्ववत करण्याचे आश्वासन दिले असले तरी, स्थानिकांचा रोष आणि प्रश्न कायम आहेत .




रविवारी सेंट पीटर आणि सेंट पॉल यांच्या फेस्ताच्या निमित्ताने दिवाडी येथील गावकऱ्यांनी पारंपरिक सांगोड' उत्सव साजरा केलारविवारी सेंट पीटर आणि सेंट पॉल यांच्या फेस्ताच्या निमित्ताने दिवाडी येथील गावकऱ्यांनी पारंपरिक सांगोड' उत्सव साजरा केला.

# विहिरीत सांडपाण्याची गळती ; ज्येष्ठ नागरिक धोक्यात

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** कुडतरी येथील रहिवासी आणि ज्येष्ठ नागरिक कॉन्स्टँटिनो टेलेस यांनी त्यांच्या घराजवळील विहिरीत सांडपाण्याचे पाणी मिसळल्याचा गंभीर आरोप करत स्थानिक प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांचे लक्ष वेधले आहे. ही परिस्थिती केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर आसपासच्या नागरिकांच्या आरोग्यासाठी देखील गंभीर धोका ठरू शकते, असा त्यांचा इशारा आहे.

टेलेस यांनी सांगितले की, माझ्या घरातील विहीर ही पिण्यासह घरगुती वापरासाठी एकमेव पाण्याचा स्रोत आहे. परंतु सांडपाणी थेट जमिनीत झिरपत असून ते विहिरीत मिसळत आहे. परिणामी, पाणी आता वापरण्यास असुरक्षित झाले आहे. एक वृद्ध नागरिक म्हणून, मला अशा पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचा धोका जास्त आहे.

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता टेलेस यांनी कुडतरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि स्थानिक ग्रामपंचायतीकडे तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी केली आहे. त्यांनी विहिरीच्या पाण्याची सखोल तपासणी करून दूषिततेचे प्रमाण आणि त्याचा संभाव्य परिणाम आरोग्यावर काय होऊ शकतो, याचा त्वरित अभ्यास करावा, अशी विनंती केली आहे.

टेलेस यांनी सांगितले की, माझी मागणी केवळ वैयक्तिक नाही. परिसरातील अनेक घरांची पाण्याची गरज या विहिरीवर अवलंबून आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात येऊ शकते.

कुडतरी मधील अनेक रहिवाशांनी याआधीही स्थानिक ड्रेनेज आणि सांडपाणी व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. अनेक ठिकाणी नाल्यांची योग्य देखभाल न केल्याने गटारे ओसंडून वाहतात आणि पावसाळ्यात या पाण्याचा थेट विहिरींवर परिणाम होतो, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिकांनी प्रशासनाला स्पष्टपणे आवाहन केले आहे की सांडपाणी गळतीचा स्रोत शोधून काढावा आणि तातडीने उपाययोजना करून भविष्यातील प्रदूषण टाळावे.आरोग्य केंद्र आणि पंचायत कार्यालय यांनी संयुक्तपणे या गंभीर बाबीवर लक्ष केंद्रित करून कार्यवाही करावी, अशी त्यांची मागणी आहे.

सध्या पर्यंत कुडतरी ग्रामपंचायत किंवा आरोग्य केंद्राने या तक्रारीवर कोणताही अधिकृत प्रतिसाद दिलेला नाही. मात्र परिसरातील वाढती अस्वच्छता, पिण्याच्या पाण्यावरचा धोका आणि नागरिकांच्या तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेता, स्थानिक प्रशासनाने लवकरात लवकर उपाययोजना करणे आवश्यक आहे, अशी सामूहिक भावना तयार झाली आहे.

पाणी ही मूलभूत गरज असून त्याच्या शुद्धतेकडे दुर्लक्ष केल्यास संपूर्ण गावाला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात, असा इशारा स्थानिकांकडून दिला जात आहे.

# कधी मिळणार २४ तास आपत्कालीन सेवा ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २९ :** नावेली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात २४ तास आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरू करण्याचे आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांनी जाहीरपणे दिलेले आश्वासन अद्यापही पूर्ण झालेले नाही. १८ मे रोजी आयोजित एका मेगा आरोग्य शिबिरात त्यांनी डॉक्टर, परिचारिका आणि हृदयविकार तज्ज्ञांसह पूर्णवेळ आपत्कालीन विभाग सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर महिन्याभराहून अधिक काळ लोटूनही या घोषणेला प्रत्यक्षात मूर्त स्वरूप आलेले नाही.

स्थानिक नागरिकांनी या घोषणेला सुरुवातीला स्वागतार्ह मानले होते, कारण हे आरोग्य केंद्र दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर असून परिसरातील वाढती लोकसंख्या आणि वैद्यकीय गरजा लक्षात घेता २४ तास सेवा ही अत्यावश्यक बाब आहे.

परंतु प्रत्यक्षात, आरोग्य केंद्र दुपारी चारनंतर बंद होते आणि कोणतीही आपत्कालीन सुविधा उपलब्ध नाही. ना डॉक्टरांची उपस्थिती, ना घोषित केलेली हृदयरोग रुग्णवाहिका . यामुळे रात्रीच्या सुमारास उद्भवणाऱ्या वैद्यकीय अडचणींना सामोरे जाणाऱ्या नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे.

आरोग्य केंद्राशी संलग्न असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, आम्ही पणजी येथील आरोग्य सेवा संचालनालयाकडे २४ तास आपत्कालीन विभाग सुरू करण्याचा प्रस्ताव पाठवला आहे, पण अद्याप कोणताही लेखी प्रतिसाद मिळालेला नाही. प्रशासनिक प्रक्रिया आणि मंजुरीच्या टप्प्यांमुळे उशीर होत आहे.

नावेलीचे आमदार उल्हास तुयेकर यांनी हेराल्डशी बोलताना सांगितले, मी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्मरणपत्र पाठवले आहे. नागरिकांना वेळेत आरोग्यसेवा मिळणे ही त्यांची मूलभूत गरज असून मी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करत आहे.

दरम्यान, याच आरोग्य केंद्राचे १० खाटांच्या छोटेखानी रुग्णालयात रूपांतर करण्याची योजना सरकारने पूर्वीच रद्द केली आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये आणखी निराशा पसरली आहे. अधिकाऱ्यांनी त्याचे समर्थन करताना म्हटले होते की, अशी सुविधा देणे म्हणजे जिल्हा रुग्णालयाच्या सेवा पुन्हा सुरू करणे होईल, जे आवश्यक नाही.

सध्या, ना आपण दिलेली आश्वासने पूर्ण झालेली आहेत, ना आरोग्य केंद्राचे दर्जात्मक अपग्रेडिंग झाले आहे. परिणामी, स्थानिक रहिवासी शासनाकडे आर्जव करत आहेत की त्यांनी त्वरित पावले उचलावीत आणि नावेली मध्ये २४ तासांची आपत्कालीन आरोग्य सेवा सुरु करून नागरिकांचा विश्वास आणि आरोग्य सुरक्षीत करावा , जे सध्या केवळ घोषणांपुरते मर्यादित आहे.

# बेकायदेशीर संरक्षक भिंतींमुळे पूर संकट ?

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. २९ :** खांडेपार आणि उसगाव येथील नदीकाठच्या गावांमध्ये पूराची भीती अधिक गडद होत चालली आहे. नैसर्गिक पूर परिस्थिती तर वर्षानुवर्षे ओळखीची आहेच, मात्र यंदा स्थानिकांमध्ये खळबळ उडवणारी चिंता आहे ती म्हणजे बेकायदेशीर बांधकामांमुळे उद्भवणाऱ्या मानवनिर्मित आपत्ती'ची.

दोन्ही गावांतील संवेदनशील पाणलोट क्षेत्रांमध्ये अलीकडेच काही व्यक्तींनी परवानगीविना संरक्षक भिंती बांधायला सुरुवात केली आहे. स्थानिकांचा आरोप आहे की, या भिंती नदीच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण करतील आणि त्यामुळे पूरस्थिती अधिक गंभीर होईल.

गेल्या आठवड्यात बागा–खांडेपार परिसरातील संतप्त नागरिकांनी कुर्टी खांडेपार उप–पंचायत कार्यालयावर मोर्चा काढत आपला रोष व्यक्त केला. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की सखल भागात बेकायदेशीरपणे उभारण्यात येणाऱ्या संरक्षक भिंतींमुळे गावामध्ये पूराची तीव्रता वाढू शकते. त्यामुळे पंचायत आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने तात्काळ हस्तक्षेप करावा, अशी त्यांची जोरदार मागणी होती.

असाच एक प्रकार उसगाव गावातही पुढे आला आहे. गांजे नदीच्या काठावर शेतजमिनीत संरक्षक भिंत बांधली जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. ही भिंत नदीच्या पाण्याचा प्रवाह अडवू शकते आणि परिणामी आसपासच्या वॉर्डांमध्ये अचानक पूरस्थिती निर्माण होऊ शकते.

स्थानिक रहिवासी रोहन नाईक यांनी सांगितले की , मेडिटेम्बी–उसगाव परिसरातील एका व्यक्तीने शेताजवळ अतिक्रमण करून ही भिंत बांधायला सुरुवात केली आहे. ही भिंत चार वॉर्डांसाठी धोकादायक ठरू शकते. काही मिनिटांत पाण्याची पातळी वाढते आणि दरवर्षी अग्निशमन आणि आपत्ती बचाव पथक येथे पोहोचतात.

नाईक यांनी आठवण करून दिली की दहा वर्षांपूर्वी एका तरुणाचा पुरात मृत्यू झाला होता, आणि १९८२ व २०२१ मध्ये या गावांनी गंभीर पूरस्थिती अनुभवली होती, ज्यात अनेक मातीची घरे वाहून गेली होती.

खांडेपार आणि उसगावमधील नागरिकांनी आता टाउन ॲण्ड कंट्री प्लॅनिंग , सीआरझेड, स्थानिक पंचायत, मामलतदार आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे लेखी मागण्या केल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, जुलैमध्ये पावसाचा जोर वाढण्यापूर्वीच संबंधित बांधकामांची तात्काळ पाहणी करावी आणि आवश्यक ती कारवाई करावी.

कर्नाटकातून वाहणाऱ्या म्हादई नदीच्या दोन प्रमुख उपनद्या गोव्यात प्रवेश करतात एक दूधसागरमार्गे धारबांदोडा व फोंडा तालुक्यातून, तर दुसरी सत्तारी मार्गे गांजे नदी म्हणून उसगावमध्ये. या दोन्ही नद्या उसगावजवळ सोनारबाग परिसरात एकत्र येऊन पुढे मांडवी नदी म्हणून वाहतात.

जुलै महिन्यात हे दोन्ही प्रवाह अतिशय वेगाने ओसंडून वाहतात, आणि त्यामुळे खांडेपार व उसगाव येथील काठच्या वस्त्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती उद्भवते. आजवर निसर्गाचा सामना करून पुन्हा उभे राहिलेल्या या गावांना आता बेकायदेशीर मानवनिर्मित अडथळ्यांमुळे अनावश्यक धोक्याला सामोरे जावे लागणार, अशी स्थानिकांची भावना आहे.

स्थानिकांनी एकमुखाने राज्य प्रशासनाला आणि जिल्हा यंत्रणेला आवाहन केले आहे की त्यांनी मानवनिर्मित अडथळे दूर करून, पर्यावरणस्नेही आणि सुरक्षित उपाययोजना राबवाव्यात.

